**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

उद्योग सारथी
महाकाली गुंफा मार्ग,
मरोळ, अंधेरी (पूर्व),
मुंबई - ४०० ०९३

**क्र.मऔविम/विधी व कामकाज विभाग/** ६० /२००८
दिनांक : २०/०५/२००८.

# परिपत्रक

**विषय : महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड अपंग व्यक्तीस वाटप करणेबाबत.**

महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे वाटप ज्याप्रमाणे प्रकल्पग्रस्त (भूपिडीत) व्यक्तीस करण्यात येते, त्याच धर्तीवर अपंग व्यक्तीस भूखंडाचे वाटप करण्यासंदर्भात महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक ०१/१२/१९९८ रोजी झालेल्या २५३ व्या सभेत ठराव क्र.३३६७ पारीत करण्यात आला होता.

त्याप्रमाणे अपंग व्यक्तीस १०० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप औद्योगिक दराने व्यापारी प्रयोजनासाठी करण्यात येत होते. अपंग व्यक्ती (समान संधी हक्काचे अधिकार, संरक्षण संपूर्ण सहभाग) कायदा १९९५ मधील तरतूदीनुसार अपंगांना सवलतीच्या दराने व प्राधान्याने भूखंड वाटप करणे अपेक्षित असल्याने, त्या संदर्भातील बाब महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २१/०१/२००८ रोजी झालेल्या ३१८ व्या सभेत विचारार्थ सादर करण्यात आली होती. सदर बाबीवर संचालक मंडळाच्या सभेत सकारात्मक विचार होऊन ठराव क्र.४५१४ पारीत करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने अपंग व्यक्तींना भूखंडाचे वाटप करण्याबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत असून सदरहू मार्गदर्शक तत्वे या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू करण्यात येत आहेत.

१) महामंडळाच्या कोणत्याही औद्योगिक क्षेत्रामध्ये, प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्याकरिता नियोजन करण्यात आलेल्या १०० चौ.मी. किंवा त्यापेक्षा छोटया आकाराच्या, वाटपास उपलब्ध भूखंडाच्या एकूण ३ टक्के भूखंड अपंगांकरिता आरक्षित ठेवण्यात यावेत.

२) प्रकल्पग्रस्तांना जसे सवलतीच्या दराने भूखंडाचे वाटप केले जाते त्याच दराने अपंगांना आरक्षित केलेल्या भूखंडाचे वाटप करण्यात यावे.

३) अपंगांसाठी आरक्षित केलेल्या भूखंडांची संख्या व त्यांना देण्यात येणा-या सवलतीबाबत स्थानिक स्तरावर पुरेशी प्रसिध्दी करुन अपंगांकडून अर्ज मागविण्यात यावेत.

४) यापूर्वी महामंडळाच्या संबंधीत कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज व जाहिरातीद्वारे प्राप्त होणारे अर्ज एकत्रित करण्यात यावेत.

५) आरक्षित भूखंडांची संख्या प्राप्त अर्जांपेक्षा जास्त असल्यास सर्व भूखंडाचे वाटप सोडत पध्दतीने करण्यात यावे, तसेच भूखंड क्रमांक सोडत टाकून निश्चित करण्यात यावेत.

६) प्राप्त अर्जांची संख्या उपलब्ध भूखंडांपेक्षा जास्त असल्यास, भूखंड वाटपासाठी योग्य ते निकष लावून गरजू व होतकरु अर्जदार निवडावेत. उदा. अपंगत्वाचे जास्तीत जास्त प्रमाण असणारे अपंग, महिला अपंग, तरुण अपंग, ज्यांचे उत्पन्नाचे दुसरे साधन नाही त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

७) अपंग सदराखाली वाटप केलेले भूखंड यापुढे फक्त योग्य अपंग व्यक्तीलाच, ५ (पाच) वर्षानंतर महामंडळाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अधिमुल्याच्या फरकाची रक्कम आकारुन हस्तांतरण करता येईल. मात्र, कुठल्याही परिस्थितीत अपंग व्यक्तीशिवाय इतर व्यक्तीस सदर भूखंड हस्तांतर करता येणार नाही.

८) अपंग व्यक्तीस भूखंड वाटप करण्याचे अधिकार प्रादेशिक अधिकारी, मऔविम यांना याद्वारे प्रदान करण्यात येत आहेत.

सर्व संबंधितांनी वरील मार्गदर्शक तत्वांची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व सदरचे परिपत्रक हे निर्गमित केल्याच्या तारखेपासून लागू राहील.

(राजीव जलोटा)
मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रति,

१) सह मुख्य कार्यकारी अधिकारी (सं), मऔविम, मुंबई,
२) सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा व तं), मऔविम, मुंबई
३) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
४) मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, नागपूर
५) जनसंपर्क अधिकारी, मऔविम,
६) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
७) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
८) संपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई
९) मु.भू.व पु.अ., मऔविम, मुंबई
१०) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
११) सर्व उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम (मुंबई / पुणे / नागपूर / औरंगाबाद)
१२) वरीष्ठ अधिकारी (नाजकधा) व व्यवस्थापक (उद्योग विकास), मऔविम, मुंबई.
१३) सर्व महाव्यवस्थपक, जिल्हा उद्योग केंद्र
१४) भूविभाग कार्यासन-१,२,३ आणि ४ मऔविम
१५) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, मरोळ / ओरिएन्ट हाऊस.
१६) कार्यालयीन परिपत्रक नस्ती / सुरक्षा नस्ती.
१७) म.औ.वि.म. औद्योगिक क्षेत्रातील सर्व औद्योगिक संघटना यांचे माहितीसाठी रवाना.